दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता






vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.८ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १९१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 8 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 191 | Pages 4 | Rate 4 Rs


# सर्वच बँकांचे पीककर्ज होणार माफ

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

## आतापर्यंतची सर्वात चांगली कर्जमाफी असल्याचा दावा

**दैनिक वादळ वार्ता**
**नागपूर (वृत्तसंस्था)**

ज्या बँकांना पीक कर्ज देण्याचा अधिकार आहे, त्या बँकांतून पीक कर्ज घेतलेल्या सर्वच शेतकऱ्यांना सरकारच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. यामुळे सरकारच्या कर्जमाफीचा लाभ कोणकोणत्या शेतकऱ्यांना मिळणार? याविषयीची संभ्रमावस्था संपुष्टात आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याची घोषणा केली. पण या कर्जमाफीचा लाभ कोणत्या बँकांकडून घेतलेल्या पीक कर्जावर मिळेल याविषयी वेगवेगळे दावे-प्रतिदावे केले जात होते. पण आता मुख्यमंत्र्यांनी स्वतः याविषयीची स्थिती स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, मी शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली आहे. त्यामुळे त्याबद्दल कुणाच्याही मनात संभ्रम नाही. काही लोक वेगवेगळ्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करतात. कुणी म्हणतो राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज माफ होणार नाही, कुणी म्हणतो जिल्हा बँकेचे होणार नाही, कुणी म्हणतो या सोसायटीची होणार नाही, कुणी म्हणतो त्या सोसायटीची होणार नाही.पण सरकारने पीक कर्ज देण्याचा अधिकार असणाऱ्या कोणत्याही बँकेने दिलेले २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ आमचा प्रयत्न हा आहे की, माफी शेतकऱ्याला द्यायची आहे बँकेला नाही. त्यामुळे या निर्णयाचा फायदा शेतकऱ्याला व्हावा यासाठी काम सुरू आहे. आम्ही यापूर्वीच सांगितले आहे की, ३० जूनच्या आधी आपण कर्जमाफी करणार आहोत. त्यामुळे आता ही घोषणा बजेटमध्ये करण्यात आल्यामुळे पुढच्या कारवाईला सुरुवात होईल. समिती यावर काम करत आहे. ही समिती यासंबंधीच्या सगळ्या गोष्टी सांगेल. मी एवढेच सांगतो की, ही कर्जमाफी यापूर्वीच्या सर्वच कर्जमाफीच्या निर्णयांहून चांगली आहे.मुख्यमंत्र्यांनी यावेळी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्प विदर्भासाठी गेमचेंजर ठरणार असल्याचाही दावा केला. कालच्या अर्थसंकल्पात संपूर्ण महाराष्ट्राला भरभरून मिळाले आहे. जेव्हा महाराष्ट्राला भरभरून मिळते, तेव्हा विदर्भ कसा मागे राहील. विदर्भासाठी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्प विदर्भासाठी गेम चेंजर ठरेल. हा प्रकल्प आतापर्यंतच्या आपल्या इतिहासातील सगळ्यात मोठा नदीजोड प्रकल्प आहे. त्याला प्रशासकीय मान्यता देऊन त्याचा आपण अर्थसंकल्पात समावेश केला आहे. त्यामुळे विदर्भाचे चित्र पूर्णपणे बदलेल, असे ते म्हणाले.



### इराण युद्धावर भीतीचे वातावरण तयार करू नका

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी माध्यमांना इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धावर नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होईल असे चित्र निर्माण न करण्याचेही आवाहन केले. माझी माध्यमांना विनंती आहे की, नागरिकांमध्ये विनाकारण भीतीचे वातावरण करू नये. जी काही परिस्थिती आहे, ती केंद्र सरकार हाताळत आहे. ती केंद्र सरकार सांगत आहे. विनाकारण वेगवेगळ्या बातम्या दाखवून हे घडणार, ते घडणार असे सांगून नागरिकांच्या मनात भीती व संभ्रम तयार करणे हे देशाच्या व समाजाच्या नाही. केंद्र सरकारनेही काल हेच स्पष्टपणे सांगितले आहे, असे ते म्हणाले.

# पंचायतसमिती कार्यालय केज येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची बैठक संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

पंचायत समिती कार्यालय केज येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे सुरू करण्या साठी तसेच ती गावागावात गतिमान व पारदर्शक पद्धतीने राबविण्याच्या दृष्टीने आढावा बैठक घेतली. शेतकरी बांधवांच्या शेतापर्यंत सुलभ दळणवळणाची सुविधा निर्माण होणे ही काळाची गरज आहे.पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी होणारा त्रास,उत्पादन बाजारपेठेत पोहोचवताना येणाऱ्या अडचणी तसेच आपत्कालीन परिस्थितीत होणारी गैरसोय दूर करण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.याबैठकीत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यां सोबत या योजनेची कार्यपद्धती अधिकसोपी, सुलभ व कालबद्ध करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या.गावनिहाय प्राधान्यक्रम,तांत्रिक



मानके,निधी नियोजन तसेच कामांच्या दर्जा बाबत स्पष्ट दिशा निश्चित करण्यात आली.तसेच ग्रामीण भागातील पाणंद व शेत रस्त्यांना क्रमांक देणे,अतिक्रमण काढून रस्ते मोकळे करणे व त्याची एफ-१ मध्ये नोंद करणे आवश्यक असून संबंधित प्रस्ताव ग्राम पंचायत व महसूल विभागाने तहसील कार्यालय व केज पंचायत समितीकडे सादर करावेत,त्यानंतर समिती मार्फत मंजुरीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडवणारी मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना राबविण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह असून शासनाचे कौतुक आहे. याचबरोबर मातोश्री पाणंद रस्ते योजनाही सुरू राहणार असून या योजनेतील त्रुटी दूर करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.मोठ्या प्रमाणात कामे प्रलंबित राहण्यामागे ऑनलाईन हजेरी प्रणाली,मस्टर काढण्यातील अडचणी, जिओ टॅगिंग प्रक्रिया, नवीन स्पर्श प्रणालीची अंमलबजावणी, ऑनलाईन इ-एमबी प्रशिक्षणाचा अभाव, रोजगार सेवकांचे असहकार्य तसेच स्थानिक कार्यालयातील दिरंगाई या बाबी कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले.या त्रुटी दूर झाल्यास शेतकरी बांधवांना निश्चित दिलासा मिळेल.

या बैठकीस अंबाजोगाई चे नगराध्यक्ष श्री. नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा,समितीचे सचिव उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे साहेब, तहसीलदार राकेश गिड्डे केज,तहसीलदार विलास तरंगे अंबाजोगाई,बीड गट विकास अधिकारी तसेच तीनही तालुक्यांतील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# चौसाळा येथील पत्रकार विकास नाईकवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त सफाई कामगारांना साडीचे वाटप



**दैनिक वादळ वार्ता**
**चौसाळा । प्रतिनिधी**

तालुक्यातील चौसाळा येथील पत्रकार तथा ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त चौसाळा येथील ग्रामपंचायतीच्या सफाई कामगार महिलांना साडीचे वाटप करण्यात आले .

पत्रकार विकास नाईकवाडे यांचा वाढदिवस प्रत्येक वर्षी विविध उपक्रमांनी साजरी केला जातो याहीवर्षी अवाजवी खर्चाला फाटा देत सामाजिक उपक्रम राबवत चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये साडी चे वाटप करण्यात आले यावेळी चौसाळा शहराच्या सरपंच सौ मंगल प्रेमचंद लोढा , ज्येष्ठ नेते प्रेमचंद उर्फ बाबू शेठ लोढा ग्रामपंचायत सदस्य सौ विजया किशोर ढोकणे , सौ ज्योती बाबासाहेब जाधव , सौ आशा अंकुश सोनवणे , सौ पल्लवी सुरेश तोडकर , सौ शमा अजाउद्दिन शेख , सौ सायरा इस्माईल शेख व ग्रामपंचायतचे कर्मचारी उपस्थित होते.

# ‘मोठे आकडे, पोकळ घोषणा’; राज्याची वाटचाल दिवाळखोरीकडे : हर्षवर्धन सपकाळ


**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात केवळ मोठे आकडे आणि पोकळ घोषणा असून प्रत्यक्षात महाराष्ट्राची वाटचाल दिवाळखोरीकडे सुरू आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. ४० हजार कोटी रुपयांच्या तुटीचा हा अर्थसंकल्प राज्यावर कर्जाचा डोंगर वाढवणारा असल्याची टीकाही त्यांनी केली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात बुलेट ट्रेन, मेट्रो आणि भुयारी मार्गांसारख्या प्रकल्पांचा मोठा उल्लेख असला तरी गाव-खेड्यातील गरीब, आदिवासी, कष्टकरी, महिला, बेरोजगार आणि तरुण यांना यात स्थान नाही. हा अर्थसंकल्प मोजक्या शहरांसाठी आणि मोजक्या लोकांसाठी असल्याचा आरोप सपकाळ यांनी केला.सपकाळ म्हणाले की, ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ आणि १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न हे केवळ दिवास्वप्न आहे. राज्यावरील कर्ज आणि कर्जाची हमी मिळून सुमारे १२ लाख कोटी रुपयांचा बोजा आहे. दरवर्षी कर्जाच्या हप्त्यापोटी ६५ हजार कोटी रुपये भरावे लागत आहेत. त्यामुळे अर्थसंकल्पातील आकडे आणि प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती यामध्ये मोठी तफावत असल्याचा दावा त्यांनी केला.मागील अर्थसंकल्पात अनुसूचित जातींच्या योजनांसाठी २२,६५८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात केवळ ६,२०० कोटी रुपयेच खर्च झाले. मागासवर्गीय, अल्पसंख्याक आणि आदिवासी योजनांबाबतही मोठ्या घोषणा केल्या जातात, परंतु निधी खर्च होत नाही, अशी टीका सपकाळ यांनी केली.राज्यातील सर्वात मोठी समस्या बेरोजगारी असताना अर्थसंकल्पात केवळ ७५ हजार नोकरभरतीची घोषणा करण्यात आली आहे. भाजप सरकारच्या मेगाभरतीचा इतिहास पाहता ही घोषणाही फसवी ठरू शकते, अशी शंका त्यांनी व्यक्त केली. लाडकी बहिण योजनेबाबत २१०० रुपयांचे आश्वासन अद्याप हवेतच असल्याने महिलांची पुन्हा फसवणूक झाल्याचा आरोप त्यांनी केला.शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली असली तरी आधीच्या कर्जमाफी योजनेतील अनेक शेतकरी अजूनही लाभापासून वंचित आहेत. त्यामुळे नवीन घोषणाही शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारी ठरू नये, अशी टीका त्यांनी केली. राज्यातील सिंचन क्षेत्र ५६ लाख हेक्टरवरून ३९ लाख हेक्टरपर्यंत घटल्याचे सांगत सरकारने शेतीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही त्यांनी केला.तसेच तिसरी आणि चौथी मुंबई, शक्तीपीठ महामार्ग आणि वाढवण बंदर यांसारखे प्रकल्प उद्योगपती अदानी आणि अंबानी यांच्या फायद्यासाठी असल्याचा आरोप सपकाळ यांनी केला. सौरऊर्जा धोरणामुळे वीज ग्राहकांवर प्रति युनिट २६ पैशांचा अतिरिक्त भार पडणार असल्याची टीकाही त्यांनी केली.

# ब्रेक फेल झाल्याने कोंडाईबारी घाटात ट्रकचा भीषण अपघात

## जिवंत जळालेल्या चालकाचे थरारक बचावकार्य

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**



धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावरील कोंडाईबारी घाटात दिनांक ६ रोजी सकाळी एका मालट्रकला झालेल्या भीषण अपघाताने परिसरात खळबळ उडाली आहे. ट्रकचे ब्रेक अचानक निकामी झाल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि दोन वाहनांना जोरदार धडक देऊन ट्रकला भीषण आग लागली. मात्र, प्रसंगावधान राखत स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी दाखवलेल्या धाडसामुळे चालकाचे प्राण वाचले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, ढछ,५२,ऊ,२३६८ क्रमांकाचा मालट्रक धुळ्याच्या दिशेने जात होता. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास हा ट्रक कोंडाईबारी घाटात असतानाच अचानक त्याचे ब्रेक फेल झाले. घाटातील उतारावर नियंत्रण सुटल्याने या ट्रकने समोरील दोन वाहनांना जोरात धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, ट्रकच्या केबिनचा पूर्णपणे चक्काचूर झाला. यात चालक केबिनमध्येच अडकून पडला होता, त्यातच तांत्रिक बिघाडामुळे केबिनने पेट घेतला.आगीच्या ज्वाळा पाहून घटनास्थळी एकच धावपळ उडाली. चालकाचे प्राण वाचवणे कठीण असल्याचे दिसत असतानाही, स्थानिक नागरिक आणि महामार्ग पोलिसांनी जिवाची बाजी लावली. आगीच्या लोळांतून चालकाला सुखरूप बाहेर काढण्यात त्यांना यश आले. या धाडसी बचावकार्यामुळे एकाचे प्राण वाचले.अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. विसरवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक कोंडी दूर केली आणि मार्ग पुन्हा सुरळीत केला. जखमी चालकावर सुरुवातीला विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले, त्यानंतर त्याला पुढील उपचारांसाठी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

# संपादकीय

## हवे हिरवे छत्र

शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या विकासाच्या शर्यतीत शहरी वृक्षसंपत्तीचे महत्त्व वारंवार दुर्लक्षित केले जात आहे. प्रत्यक्षात झाडे ही केवळ सौंदर्य नव्हे, तर पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेची अत्यावश्यक पायाभूत सुविधा आहेत.असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो – परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच-त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो.भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरु, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही. हे पायाभूत सुविधांचे म्हणणे आहे आणि भारतातील शहर नियोजनकार अभियंते, महानगरपालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी हे स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. योग्य व्यवस्थापन केल्यास ती स्वतःच 'विकास' आहेत का महत्त्वाचा मूलमंत्र आहे.मी आर्बोरिस्ट आहे, असे सांगितले की अनेकदा समोरच्याचा प्रतिसाद फक्त विनम्रपणे मन डोलवण्यापुरता असतो आणि समज असतो की मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो किंवा विकेंडला कुंपण छाटतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे. आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष-प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे यांशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो. हे प्रत्येक अर्थाने शहरी पायाभूत सुविधा व्यवस्थापनाचे एक शास्त्र आहे, जे भारताच्या मुख्य प्रवाहातील नियोजनातून जवळपास पूर्णपणे गायब आहे. एका प्रौढ झाडाचा शहरासाठी विचार करा. ते कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी होते, जैवविविधता टिकते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर त्याचे सिद्ध परिणाम होतात. हे हजारो झाडांच्या शहरी जंगलात गुणाकार करा. आर्थिक मूल्य थक्क करणारे आहे आणि ते गमावल्यावरची किंमतही तितकीच मोठी आहे.मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरांमध्ये आर्बोरिकल्चरसाठी सर्वात मोठे आव्हान दिसते. कारण हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे – जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याच वेळी हे एक अखंड पायाभूत दबावाखाली असलेले शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. अनेक नव्हती. यातील फरक – झाड वाचवणे आणि झाड तोडणे – हा बऱ्याचदा एवढाच असतो की नियोजनाच्या टप्प्यात प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेत होता का? सुरक्षिततेचा आयाम तर आणखीच महत्त्वाचा आहे. मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामाच्या नुकसानीमुळे झाडे धोकादायक बनतात. संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेले झाड अप्रशिक्षित डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते आणि एक दिवस अचानक कोसळते. प्रमाणित आर्बोरिस्टकडून जोखीम मूल्यांकन हे ऐषोआरामाची गोष्ट नाही ती सार्वजनिक सुरक्षा आहे.जागरूकता आणि शिक्षण आवश्यक आहे पण पुरेसे नाही. भारतीय शहरांचा झाडांशी असलेला संबंध बदलण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप हवा, आणि तो तातडीने हवा. रोपटे लावणे म्हणजे प्रौढ झाड जतन करणे नव्हे. शंभर रोपटी एका ८०-वर्षांच्या वटवृक्षाची जागा घेत नाहीत. हा फरक धोरणात रुजवायला हवा. कॉर्पोरेट भारतालाही यात भूमिका आहे. खऱ्या अर्थाने सार्थक ईएसजी बांधिलकीमध्ये प्रकल्प स्थळांवर आर्बोरिकल्चरल कसोशीचा समावेश होतो. टिकाऊपणाबद्दल गंभीर असलेल्या कंपन्यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी व्यावसायिक वृक्ष-प्रभाव मूल्यांकन करवून घ्यायला हवे. काम झाल्यावर गच्चीवर रोपटे लावणे हे ग्रीनवॉशिंग आहे.अनावश्यक तोडण्यात येणारी झाडे, चुकीच्या छाटणीने खालावणारे छत्र, अज्ञानी बांधकाम प्रथांमुळे मरणारे वारसा वृक्ष आणि अधिकाधिक गरम, गोंगाटमय आणि श्वास घेणे कठीण होत जाणारी शहरांची सध्याची परिस्थिती आहे. यावर कुठेतरी आळा बसणे गरजेचे आहे. अशी शहरे जिथे शतावर्षीय वटवृक्ष शाळेसाठी अडथळा नसतो, तर ती सर्वात मौल्यवान संपत्ती असते. शहरे वाढत राहणार आहेत. पण ती वाढ झाडांच्या विरोधात नसून त्यांच्या सहजीवनातून व्हायला हवी. 'वाढती शहरे, हिरवे छत्र' ही केवळ घोषणा नाही; ती भविष्यातील शहरांची रचना आहे. अशी शहरे जिथे पायाभूत सुविधा प्रकल्पांचा पहिला प्रश्न कोणती झाडे काढायची? असा नसून कोणती झाडे वाचवता येतील? असा असेल. मुंबई या बदलाचे नेतृत्व करू शकते आणि करायलाच हवे.

# पवित्र स्नान: सातपुड्यात होळी सुरुच असली तरी व्रत पाळणाऱ्या काही बांधवांनी केली अखेरची पूजा

## मोरखींकडून मानता सोडण्यास प्रारंभ

**मोलगी । रविंद्र वळवी**

चंद्र व सूर्यावरुन होणार्या पारंपरिक कालगणनेनुसार माघ अमावस्येच्या आधी होळीसाठी व्रत पाळणार्या मोरखींनी दुधाने पवित्र स्नान करीत मानतेला सुरुवात केली होती. होळींची नियोजित संख्या पूर्ण केल्यानंतर काही मोरखींनी त्यांचे परिधान केलेला सामान काढण्यास तथा मानता सोडण्यास सुरुवात केली आहे. यानिमित्त अखेरची पूजा व पुन्हा दुधानेच स्नान करीत आहेत. आदिवासी बांधवांमध्ये आजही चंद्र व सुर्यावरुन कालगणना होत आहे. यंदाच्या होळीसाठी देवमोगरा यात्रेपासूनच गणना सुरु झाली, त्यानुसार सातपुड्यातील व्रत पाळणाऱ्या मोरखी यांनी माघ अमावस्येला होळीसाठी दुधाने पवित्र स्नान केले होते. अमावस्येनंतर येणाऱ्या पहिल्या दिवशी चंद्राच्या भागाचे दर्शन घेत मानता तथा व्रत पाळण्यास सुरुवात केली होती. व्रत पाळणाऱ्यांमध्ये मोरपीस व मोठ्या पितळी घुंगरुवाले मोरखी, बांबूपासून निर्मिती टोप व दुधी भोपळे कमरेला बांधणारा बावा – बुध्या, हातात बांबूची सुपडी व लाकडी चमचा बाळगणारा काली,



धनुष्यबाण बाळगणारा मोरावाला व लाकडी घोडावाला यांचा समावेश आहे.

होळीची विशिष्ट पाळनी करणाऱ्या या सर्वांना होळीची ठरावीक संख्या पुर्ण करावीच लागते, ही संख्या पूर्ण करण्यासाठी जवळपासच्या गावांमधील होळीत सहभागी होऊन तेथील होळीचे दर्शन घेणे आवश्यक असते. त्यानुसारच होळीला सुरुवात झाल्यापासून बहुतांश मोरखी यांनी त्याची संख्या पूर्ण केली आहे.त्यामुळे या मोरखींकडून होळीचा मानता तथा व्रत सोडण्यास सुरुवात झाली आहे. मानतासाठी मोरखींचे संपूर्ण सामान, कपडे, अंथरुण-पांघरुणच्या चादरी व अन्य साहित्यही दुधाचा शिडकावा देत ती धुतली गेली होती. या साहित्याला अन्य कोणीही हात लावू शकत नाही. त्यामुळे हे सर्व साहित्य या मोरखींना निर्जन ठिकाणीच अलिप्त ठेवली होती. या साहित्यांसह होळीची संख्या पूर्ण करणारे मोरखी हे त्यांच्या ठरावीक पुजाऱ्यां कडुन पूजा करुन घेत आहेत. ही पूजा नेहमी नदीकाठावर करावी लागत असल्याने सातपुड्यातील बहुतांश नदीकाठावर अखेरची पूजा करणार्यांची संख्या वाढली आहे. या मोरखींकडून पूजेनंतर पुन्हा दुधानेच पवित्र स्त्रान केले जात आहे. सातपुड्यात होळीचा समारोप झाला नसला तरी या बहुतांश मोरखींकडून सामान सोडविण्यात येत आहे.

**व्रत कालावधीतील पारंपारिक नियम**

होळीसाठी व्रत पाळणाऱ्या मोरखी, बावा -बुध्या, ढाणका डोकोअं, तीर-कामठाधारी मोरावाला यांना व्रत (पालनी) कालावधीत त्यांना मांसाहार वर्ज्य असते. कुठल्याही कपड्यांना सहज स्पर्श न करणे शिवाय खाट-खुर्ची, चप्पलांचा त्याग ही करावा लागतो. आवश्यकतेपेक्षा अधिक वेळ कपडे परिधान करणे, जीवजंतूला दगड फेकून मारणे, अपशब्द उच्चारणे अशा बाबी देखील टाळाव्या लागतात. त्यानुसारच या मोरखींनी संपूर्ण नियमांचे पालन केले.

# मासिक पाळी दरम्यान रजेचा निर्णय स्त्रीच्या इच्छेवर अवलंबून असावा विषमता पसरणार नाही याची काळजी घेणे गरजेचे-उपसभापती डॉ.गोऱ्हे

## जागतिक महिला दिनानिमित्त स्त्री आधार केंद्राचा परिसंवाद; मासिक पाळी रजेवर सखोल चर्चा

**दैनिक वादळ वार्ता**

**पुणे । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला स्त्री आधार केंद्राच्या वतीने पुण्यात 'महिलांचे आरोग्य अधिकार मासिक पाळीत रजेची तरतुद' या विषयावर परिसंवाद आणि कविता वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधान परिषदेच्या उपसभापती व स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे होत्या. डॉ. गोऱ्हे यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, मासिक पाळी हा स्त्रियांच्या जीवनातील नैसर्गिक आणि महत्त्वाचा भाग आहे. आज या सरकार या मुद्द्यावर सर्व बाजूंनी विचार करत आहे आणि लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. मात्र, रजेमुळे महिलांना विषम वागणूक किंवा भेदभाव मिळू नये याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक स्त्रीचे दैनंदिन काम, आरोग्य आणि गरजा वेगवेगळ्या असतात. त्यामुळे रजा घ्यायची की नाही, हे पूर्णपणे तिच्या वैयक्तिक निर्णयावर अवलंबून असावे. मासिक पाळी रजा असे थेट नाव न देता त्याला अधिक संवेदनशील आणि समानतावादी नाव द्यावे, अशी सूचना त्यांनी केली. तसेच या स्त्रियांनी स्वतःच्या शरीराची काळजी घ्यावी आणि मासिक पाळीबाबतच्या सामाजिक धारणा बदलत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, राज्य सरकारने एकल महिलांच्या सर्वेक्षणासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली असून, हे काम सुरू झाले आहे. यामुळे एकल महिला अधिक सक्षम होतील. हे सर्व्हेक्षण करावे यासाठी मी उपसभापती या नात्याने माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे एकल महिलांचे सर्वेक्षण आणि धोरणाची मागणी दि.६मे २०२५ रोजी केली असल्याचे त्यांनी सांगितले. 'बोलत्या व्हा आणि लिहित्या व्हा' हा संकल्प महिला दिनानिमित्त करण्यात आला असून, महिलांनी मोठ्या संख्येने यात सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. कमिशन




ऑन द स्टेटस ऑफ वुमन (उडथ) ही लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरणासाठी समर्पित संयुक्त राष्ट्रसंघाची (णछ) मुख्य जागतिक आंतरशासकीय संस्था आहे. याच्या उडथ ७०वे सत्र नऊ मार्च पासून न्यूयॉर्क येथे सुरू होत आहे. त्याला समांतर असा 'सर्वांसाठी न्याय मिळवणे आणि बळकट करणे' या विषयावर कार्यक्रम उपसभापती कार्यालय व स्त्री आधार केंद्राच्यावतीने आयोजित करण्यात येणार आहे. त्यामध्ये सहभागी होण्यासाठी ऑनलाइन लिंक देण्यात येणार आहे. या लिंकसाठी स्त्री आधार केंद्राच्या कार्यालयात संपर्क करता येईल. असे त्यांनी सांगितले. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी नलबले-भोसले यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मासिक पाळी ही पूर्णपणे नैसर्गिक प्रक्रिया आहे. सर्व महिलांना रजा देण्याची गरज नाही. फक्त ज्यांना अति त्रास होतो, त्यांनीच रजा घ्यावी. शाळांमध्ये स्वच्छता आणि मासिक पाळीबाबत मार्गदर्शन होत असून, कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे हे देखील महत्वाचे आहे. स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त जेहलम जोशी यांनी मासिक पाळीत स्त्रियांच्या मनःस्थितीवर होणारा परिणाम आणि कामावर, घरगुती जबाबदाऱ्यांवर होणारा प्रभाव याबाबत बोलताना समाजात जनजागृती आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच, यादरम्यान महिलांना वेगळी वागणूक टाळावी, असे आवाहन केले. कार्यक्रमात कवयित्री मृणाल पवार-गायकवाड यांनी भावपूर्ण कविता वाचन केले. सूत्रसंचालन अनिता शिंदे यांनी केले. आभार मीना इनामदार यांनी मानले. यावेळी स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त जेहलम जोशी, रश्मी जोशी, मृणाल गायकवाड, अपर्णा पाठक, शोभा कोठारी आदी उपस्थित होत्या. हा परिसंवाद महिलांच्या आरोग्य अधिकार आणि मासिक पाळीशी संबंधित जागरूकता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला.

# शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प-पणन मंत्री जयकुमार रावल

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आज मांडलेला अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्र २०४७ या ध्येयाकडे नेणारा दूरदृष्टीपूर्ण, शेतकरी-केंद्रित आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे. महाराष्ट्राला पाच ट्रिलियन डॉलर ची अर्थव्यवस्था बनवण्याच्या दृष्टीने आजचा अर्थसंकल्प प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार भक्कम स्तंभांवर आधारित राज्याच्या सर्वांगीण विकासाचा स्पष्ट रोडमॅप यातून दिसून येतो, अशी प्रतिक्रिया पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचा निर्णय हा राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा ही शेतकऱ्यांचा सन्मान करणारी आहे. कृषी क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, एकात्मिक मूल्यसाखळी तसेच नैसर्गिक शेतीला चालना देणाऱ्या विविध योजनांमुळे महाराष्ट्राची शेती अधिक सक्षम आणि आधुनिक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.१० ते १५ प्रमुख पिकांसाठी एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करण्याचा निर्णय हा शेतकऱ्यांच्या उत्पादनाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच वाढवण बंदर परिसरात चौथी मुंबई विकसित करण्याचे नियोजन, त्या परिसरात लॉजिस्टिक सुविधांचा विकास, वाढवण बंदराला जोडणारा मालवाहतूक कॉरिडॉर विकास यामुळे राज्यातील कृषी उत्पादन पुरवठा साखळीला बळ मिळेल.याचा मोठा फायदा कृषी क्षेत्राला होईल.असे मंत्री रावल म्हणाले.ग्रामीण विकासावर विशेष भर देत जिल्हा विकास योजनेसाठी दुप्पट निधीची तरतूद, तीनशे कोटी वृक्ष लागवड, १००० लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रीट रस्त्यांनी जोडण्याचा निर्णय, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेद्वारे ग्रामीण रस्त्यांचे बळकटीकरण या मुळे ग्रामीण भागाचा विकासाचा वेग वाढणार आहे. तसेच ग्रीनफिल्ड महामार्ग, नवीन विमानतळे तसेच मेट्रो आणि जलमार्ग यांसारख्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमुळे राज्याच्या औद्योगिक व व्यापार विकासाला मोठी चालना मिळेल आणि मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.तसेच अग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी आणि को-ऑप स्टॅक यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून



कृषी क्षेत्रात एकात्मिक डिजिटल परिसंस्था उभारण्याचा प्रयत्न केला जात आहे. शेतीत कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) वापरण्याचा निर्णय हा आधुनिक शेतीकडे टाकलेले मोठे पाऊल असून महाविस्तार एआय, वसुधा व्हॉइस टेलिफोनी आणि महाराष्ट्र ॲग्रीकल्चर डेटा एक्सचेंज यांसारखे उपक्रम यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स इनोव्हेशन आणि इन्क्युबेटर सेंटर स्थापन करून कृषी स्टार्टअप्सना चालना देण्याचा निर्णयही स्वागतार्ह आहे. यामुळे उत्पादन खर्चात सुमारे २५ टक्क्यांपर्यंत घट होऊन उत्पादकता वाढण्यास मदत होईल.कृषी समृद्धी योजना, नवीन प्राकृतिक शेती अभियान आणि मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना यांसारख्या उपक्रमांमुळे शेतीपूरक व्यवसायांना चालना मिळेल. विशेषतः गोपालन, कुक्कुटपालन आणि शेळीपालन यांसाठी विशेष कार्यक्रम राबविणे हे ग्रामीण रोजगारनिर्मितीसाठी महत्त्वाचे ठरेल.ऊर्जा क्षेत्रातही शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू ठेवून सुमारे २० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आणि मागेल त्याला सौर कृषीपंप या योजनांमुळे शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा आणि स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढण्यास मदत होईल.

महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, लखपती दिदी अभियान तसेच बचतगटांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात येणारे 'उमेद मॉल' हे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल असल्याचेही त्यांनी नमूद केले.एकूणच हा अर्थसंकल्प शेतकरी, कामगार, महिला आणि युवक या सर्व घटकांना बळ देणारा असून कृषी व उद्योगासह सर्व क्षेत्रांसाठी नव्या संधी निर्माण करणारा आहे. विकसित महाराष्ट्राच्या दिशेने ठोस पाऊल टाकणारा आणि राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मार्गदर्शक ठरणारा हा दूरदृष्टीचा अर्थसंकल्प असल्याचे मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

# पुण्यात पशुवैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव; विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

## पशुसंवर्धन विभागाच्या यशोगाथा सोशल मीडियावरून लोकांपर्यंत पोहोचवा; महिला पशुपालकांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देण्याची आवश्यकता-उपसभापती डॉ.गोऱ्हे

दैनिक वादळ वार्ता

**पुणे | अरविंद बनसोडे कुरनूरकर**

पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी ज्येष्ठ पशुवैद्य, तज्ज्ञ आणि प्रगतशील पशुपालकांचा सन्मान करण्यासाठीही आज'ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठान, महाराष्ट्र'च्या वतीने आयोजित गौरव पुरस्कार वितरण सोहळा पुण्यातील औंध येथे पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आज या महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विविध श्रेणींमधील पुरस्कार प्रदान करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. रमेश वझरकर यांनी सांगितले की, २०११ मध्ये डॉ. नीलम गोऱ्हे यांचे वडील ज्येष्ठ पशुवैद्य डॉ. दिवाकर शंकर गोऱ्हे यांना 'जीवनगौरव' पुरस्कार मिळाला होता. त्यावेळी त्यांनी संशोधक प्राध्यापकांसाठी स्वतंत्र पुरस्कार सुरू करण्याची सूचना केली होती. वडिलांच्या या इच्छेनुसार डॉ. गोऱ्हे यांनी त्वरित आर्थिक मदत दिली आणि त्यातूनच 'डॉ. दिवाकर शंकर गोऱ्हे पुरस्कृत उत्कृष्ट पशुवैज्ञानिक पुरस्कार' सुरू झाला. यंदा हा पुरस्कार



मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. रवींद्र जयवंत झेंडे यांना देण्यात आला.अध्यक्षीय भाषणात डॉ. नीलम गोऱ्हे यांनी वडिलांच्या आठवणींना उजाळा देत सांगितले, माझ्या वडिलांनी इ-खऋ संस्थेत तज्ज्ञ डॉक्टर म्हणून ग्रामीण विकासासाठी अतुलनीय योगदान दिले. संकरित पैदास कार्यक्रम आणि पशुधनासाठी लस निर्मिती क्षेत्रात त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. फूट अँड माऊथ डिसीजवरील औषध शोधण्यात त्यांचा मोठा वाटा होता.परदेशातील पाळीव प्राण्यांच्या डॉक्टरांची कमतरता लक्षात घेता भारतातील पशुवैद्यकीय सेवेचे महत्त्व अधोरेखित करत डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, परदेशात अपॉइंटमेंट मिळणे कठीण झाले आहे, तर भारतात तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा चांगली आहे. पण या व्यवसायाला अजून पुरेसे महत्त्व मिळालेले नाही. शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार (डऊॠ) पशुसंवर्धन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पुरवणी मागण्यांमध्ये पशुसंवर्धन विभागासाठी बजेटमध्ये काय तरतुदी आहेत, यावर माझे विशेष लक्ष असून विभागाच्या प्रस्तावाला चालना देण्यासाठी मी प्रयत्नशील राहील असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.पशुसंवर्धन विभागाने यशोगाथा आणि शासकीय योजनांची माहिती सोशल मीडियाद्वारे लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन करत त्यांनी आगामी 'आंतरराष्ट्रीय महिला दिना'च्या निमित्ताने यंदाचे वर्ष 'महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे होत असल्याचे सांगितले. महिला पशुपालकांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देण्याची गरज असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली.यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी २ लाख ५१ हजार रुपयांचा निधी दिला. तसेच वडिलांनी लिहिलेले 'माझ्या जीवन लहरी' हे पुस्तक डॉ. प्रविणकुमार देवरे यांना भेट दिले.

**यंदाचे पुरस्कारप्राप्त मानकरी**

जीवनगौरव पुरस्कार: डॉ. लक्ष्मण सांडूजी वाणी

उत्कृष्ट पशुवैद्य: डॉ. सचिन वंजारी (सांगली), डॉ. पल्लवी कुरुंदकर (कोल्हापूर)

प्रगतशील पशुपालक: श्री. शिवानंद होनमोटे (सोलापूर - पशुपालन), श्री. सचिन लाखे (धाराशिव - कुक्कुटपालन), श्रीमती जयश्री गाढवे (पुणे - शेळीपालन), श्री. अमोल पवार (सातारा - मेषपालन)

कार्यक्रमात पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. श्री. मुकणे, डॉ रमेश वझरकर, श्रीमती जेहलम जोशी, श्रीमती रश्मी जोशी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी 'दूध' या विषयावरील स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले. आभार उपाध्यक्ष डॉ. विवेक क्षीरसागर यांनी मानले.

# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल,भविष्यात एज्युकेशनल हब बनेल-संतोष मुक्ता

दैनिक वादळ वार्ता

**औसा | प्रतिनिधी**

विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल येथे शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सायन्स एक्झिबिशन उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि नवसंशोधनाला चालना मिळावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी संतोष मुक्ता (लातूर लोकसभा प्रभारी, भाजप) हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवानंद पाटील व भागीरथी शिवानंद पाटील (जिल्हा परिषद सदस्य) उपस्थित होते. तसेच शाळेचे प्राचार्य व संस्थेचे सचिव बसवेश्वर धाराशिवे, प्राचार्य किशोर जेवे, अमोल कुंभार, महिशंकर धाराशिवे, विकास मुगळे, विद्या कापसे,



गोपाल दंडीमे, प्रकाश झुंजारे व जनार्धन कास्ते (माजी पंचायत समिती सदस्य), ऋतिक धाराशिवे, विलास सगरे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मेघा मुळे यांनी केले. त्यांनी 'रामन इफेक्ट' या वैज्ञानिक शोधावर प्रकाश टाकत त्याचे महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य किशोर जेवे यांनी आपल्या भाषणात शाळेची प्रगती, विविध शैक्षणिक उपक्रम व विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तसेच शाळेने स्थापनेच्या दुसऱ्याच वर्षी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवल्याचा उल्लेख केला.

सायन्स एक्झिबिशनमध्ये एकूण १३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून विविध विज्ञानाधारित प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व सादरीकरण कौशल्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.उद्घाटक संतोष मुक्ता यांनी आपल्या मनोगतात भविष्यात विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल हे शैक्षणिक क्षेत्रात आदर्श ठरेल व एक सक्षम एज्युकेशनल हब बनेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी शाळेच्या सांस्कृतिक, क्रीडा व शैक्षणिक जडणघडणीबद्दल विशेष प्रशंसा केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सायली देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शितल डोंगरे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौफाळा येथे तिथी प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी




दैनिक वादळ वार्ता

**नांदेड | प्रतिनिधी**

नांदेड प्रतिनिधी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीअनुसार चौफाळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नियोजित दूध अभिषेक करून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार आपण करून शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित गजानन साहेबराव हारकरे शिवसेना उप जिल्हा संघटक नांदेड श्रीराम सुनकेवार मनीष झगडे मस्तान मिस्तरी संतोष वाघमारे उत्तमराव सूर्यवंशी गोविंद गरुडकर धमपलवार सावकार सदाशिव उरंडे विठ्ठल पाटील उघडे अशोक वाघमारे साहेबराव जोंधळे अभय हसनपल्ली यांच्यासह शिवसैनिक परिसरातील प्रतिष्ठित नागरिक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उत्कृष्ट स्वयंसेविका सरस्वती पाटील व उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.शीला स्वामी यांचा महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**मुरूम | प्रतिनिधी**

मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात शुक्रवारी (ता. ६) रोजी विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय सेवा योजना व व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा नेतृत्व विकास उद्बोधन शिबिर २०२६ मौजे गडदेवदरी, जि. धाराशिव या ठिकाणी दि. १ ते ५ मार्च दरम्यान पार पडले. या शिबिरात माधवराव पाटील महाविद्यालयातील कु. सरस्वती पाटील, अभिषेक पुजारी, गणेश बिराजदार यांनी सहभाग नोंदवला. या शिबिरात सरस्वती पाटील यांनी अहवाल लेखन, चित्रकला स्पर्धा, पुस्तक परीक्षण, वक्तृत्व स्पर्धा, नाट्य सादरीकरण आदी स्पर्धेत उत्कृष्ट सहभाग नोंदवून जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक, अभिषेक पुजारी यांनी उत्कृष्ट अहवाल लेखन




(प्रथम) संसद अभिप्राय (द्वितीय) तर गणेश बिराजदार वक्तृत्व स्पर्धा (द्वितीय), अहवाल लेखन (प्रथम) क्रमांक पटकाविला. उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा. डॉ. शीला स्वामी यांना गौरविण्यात आले. या शिबिरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन विविध स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते शाल, प्रमाणपत्र व पुष्पहार घालून विशेष सत्कार शुक्रवारी (ता. ६) रोजी करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. सतीश शेळके, डॉ. शिवपुत्र कनाडे, डॉ. राम बजगिरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. अशोक बावगे, प्रा. गोपाळ कुलकर्णी, डॉ. विलास खडके आदींची उपस्थिती होती.

**मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात सरस्वती पाटील, अभिषेक पुजारी, गणेश बिराजदार व शीला स्वामी यांचा विशेष सत्कार चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते करताना सतीश शेळके, शिवपुत्र कनाडे, राम बजगिरे व अन्य.**

# कळका येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ निमित्त भव्य शिवशाहिरी पोवाड्याचा कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता

**कंधार | प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती सोहळा मौजे कळका ता.कंधार जि.नांदेड येथे दि.७ मार्च २०२६ शनिवार रोजी सकाळी ठीक ८.०० वाजता राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, भगवा ध्वजारोहण पार पडणार आहे.

सायंकाळी

७ .०० वाजता शिवशाहीर अरविंद घोगरे यांचा शिवशाहीरी पोवाड्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

दि.८ मार्च २०२६ रविवार रोजी सकाळी ठीक ८.०० वाजता श्री संत नामदेव महाराज बारूळकर मठ संस्थान बारूळ व श्री ह.भ.प.रोहीदास महाराज कळकेकर यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा दुग्ध अभिषेक ,दुपारी ठिक ४ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक गावातील प्रमुख रस्त्यांनी निघणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष




मा.श्री.आ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब (कळकेकर)

विधानसभा लोहा कंधार

कार्यक्रमाचे उद्घाटक

ॲड. विजय पाटील धोंडगे

मा. गोविंद पाटील शिंदे संचालक जिज्ञासा विद्यालय नांदेड

विशेष उपस्थिती

मा. विलास नरवटे साहेब

अश्विनी जगताप मॅडम

मा. रामेश्वर गोरे साहेब

मा. चंद्रकांत जाधव साहेब

मा. व्यंकटराव पा. गायकवाड

सौ. सुनंदा हरिभाऊ गाडेकर

सौ. सुमनबाई उत्तमराव पा. गायकवाड

श्री कृष्णा रामदिनवार

श्री. निशीगंधा शेवाळकर मॅडम

सौ.पुजाताई गव्हाणे मॅडम

श्री.विलास पा.गायकवाड

मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ढोल ताशा पथक

महाप्रसाद सौजन्य अविनाश हनमंतराव कळकेकर आयोजक

सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती कळका ता.कंधार जि.नांदेड.

# कुसुम सभागृहात विश्वचषक अंतिम सामन्याचा जल्लोष

## अमरनाथ राजूरकर,दिलीप ठाकूर यांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**नांदेड | प्रतिनिधी**

शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतीय संघाने इंग्लंडचा पराभव करून दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या पार्श्वभूमीवर क्रिकेटप्रेमींना अंतिम सामन्याचा थरार एकत्र अनुभवता यावा, विजयी जल्लोष करता यावा यासाठी भाजप नांदेड महानगरतर्फे रविवार दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता कुसुम सभागृह, व्हीआयपी रोड, नांदेड येथे भारत विरुद्ध न्यूझीलंड हा अंतिम सामना मोठ्या पडद्यावर मोफत दाखविण्यात येणार असल्याची माहिती महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर व जिल्हा सरचिटणीस धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी दिली आहे.प्रत्येक क्रिकेटप्रेमीची इच्छा स्टेडियममध्ये जाऊन सामना पाहण्याची असते. मात्र वेळेअभावी तसेच प्रचंड तिकीट दरांमुळे अनेकांना प्रत्यक्ष स्टेडियममध्ये जाऊन सामना पाहणे शक्य होत नाही. अशा वेळी भरगच्च सभागृहात मोठ्या पडद्यावर सामना पाहताना स्टेडियममध्ये सामना पाहण्यासारखाच थरार आणि उत्साह अनुभवायला मिळतो. याच उद्देशाने नांदेडमधील क्रीडारसिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमाला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे व ड. चैतन्यबापू देशमुख, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे तसेच ड. किशोर देशमुख,महापौर कविता मुळे, उपमहापौर दिपकसिंह रावत,सभागृह नेते ड. महेश कनकदंडे,डॉ. सचिन उमरेकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.यंदाच्या ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपांत्य फेरीत इंग्लंडवर मात केली आणि अंतिम फेरीत धडक मारली. विशेष म्हणजे २० षटकांच्या विश्वचषकाच्या इतिहासात आतापर्यंत कोणताही यजमान संघ अंतिम फेरीत पोहोचला नव्हता. भारतीय संघाने ही ऐतिहासिक कामगिरी करत देशातील क्रिकेटप्रेमींमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला आहे. तसेच सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याची आणि यजमान संघ म्हणून विश्वचषक जिंकण्याची संधी प्रथमच भारताला मिळत असल्यामुळे अंतिम सामन्याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.क्रिकेटप्रेमींना एकत्र येऊन या सामन्याचा आनंद लुटता यावा, यासाठी मोठ्या पडद्यावर सामन्याचे प्रक्षेपण करण्याची परंपरा धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांनी अनेक वर्षांपासून जपली आहे. १९९५ पासून ट्वेंटी-२० तसेच ५० षटकांच्या विश्वचषक स्पर्धांतील सामने शहरात मोठ्या पडद्यावर दाखवण्याचा उपक्रम त्यांनी सातत्याने राबविला असून मोठ्या पडद्यावर सामना दाखवण्याची ही १८ वी वेळ ठरणार आहे. भारताच्या विजयाच्या वेळी क्रीडारसिकांचा उत्स्फूर्त जल्लोष आणि देशभक्तीचा माहोल निर्माण होणे ही या कार्यक्रमाची खासियत ठरते.

# केज वासियांच्या वतीने आ.नमिता मुंदडा यांचा सत्कार, केज जिल्हा परिषद शाळा पूर्ववत होणार-आ.नमिता मुंदडा

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज वासियांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आ.नमिता मुंदडा यांच्या सत्काराचे आयोजन दि.७ मार्च रोजी शनिवारी सकाळी करण्यात आले.यावेळी केज येथील ऐतिहासिक जिल्हापरिषद माध्यमिक शाळेच्या अस्तित्वासाठी सुरू असलेल्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. शाळेची जागा इतर कोणत्याही संस्थेला किंवा खासगी कामासाठी हस्तांतरित करू दिली जाणार नाही, ही शाळा पुन्हा पूर्वी सारखीच गजबजणार, अशी ग्वाही आ.नमिता अक्षय मुंदडा यांनी दिली. या यशस्वी पाठपुराव्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केजच्या नागरिक आणि माजी विद्यार्थ्यांनी आ.नमिता मुंदडा यांचा भव्य सत्कार केला.


**विधानसभेत घुमला शाळेचा आवाज**

गेल्या काही काळापासून जिल्हा परिषद शाळेच्या जागेबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती.मात्र, आ.नमिता मुंदडा यांनी विधानसभा सभागृहात या प्रश्नावर आक्रमक भूमिका मांडली.शाळेची जागा अन्य कोणत्याही संस्थेला देऊ नये आणि तिथे पुन्हा शैक्षणिक उपक्रम जोमाने सुरू व्हावेत,ही मागणी त्यांनी लावून धरली.त्यांच्या या प्रयत्नांमुळे शाळेचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कृतज्ञता सोहळा आणि 'शब्द' आ.नमिता मुंदडा यांचा शनिवार,दि.७ मार्च रोजी शाळेच्या प्रांगणातच हा भव्य सत्कार सोहळा पार पडला.यावेळीसत्काराला उत्तर देताना आ.नमिता मुंदडा भावूक झाल्या. त्या म्हणाल्या की,शाळा हे केवळ इमारत नसून संस्कारांचे मंदिर आहे. केजच्या या ऐतिहासिक शाळेचा वारसा जपणे हे आमचे कर्तव्य आहे.मी शब्द देते की,ही जागा कोणाच्याही खासगी फायद्यासाठी वापरू दिली जाणार नाही. शाळा पूर्ववत करण्या साठी शेवटच्या श्वासा पर्यंत प्रयत्न करेन.

**आमदारांची दोन महत्त्वाची आश्वासने:**

१.शैक्षणिक संवर्धन: शाळेच्या जागेचा वापर केवळ आणि केवळ शैक्षणिक कारणांसाठीच होईल याची



कायदेशीर खबरदारी घेतली जाईल.

२.अतिक्रमणांविरुद्ध मोहीम:

केजशहरातील शासकीय भूखंडांवर झालेली अतिक्रमणे तातडीने हटवण्यासाठी प्रशासकीय स्तरावर कठोर पाठपुरावा केला जाईल असे त्यांनी सांगितले.

मान्यवरांची उपस्थिती

या ऐतिहासिक प्रसंगी आंबेजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोर काकाजी मुंदडा यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला केज परिसरातील प्रतिष्ठित नागरिक आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात प्रामुख्याने मान्यवर व शाळेचे माजी विद्यार्थी गिरीश भाऊ देशपांडे, सुनील केंद्रे,संजय चौरे सर,हनुमंतराव भोसले सर,डॉ.वासुदेव नेहरकर, प्रवीण देशपांडे.प्रकाश मुंडे,विनोद शिंदे पाटील, पिंटू पाटील,सचिन देशपांडे,समियोदीन इनामदार,विनायक नेहरकर,अड.सुंदर तपसे,सचिन नेहरकर आदि मान्यवर उपस्थित होते.अधिकारी व अतिथी मध्ये गटविकास अधिकारी श्री.विठ्ठल नागरगोजे,रहेकवाल सर,बारामतीचे शिंदे पत्रकार,बारामती रोटरीचे अध्यक्ष रविकिरण आणि माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत भोसले सर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर उपस्थितांचे आभार गिरीश भाऊ देशपांडे यांनी मानले.आ.नमिता मुंदडा यांच्या या भूमिकेचे संपूर्ण केज तालुक्यातून टाळ्यांच्या कडकडाटात आणि उत्साहात स्वागत होत आहे.

## नंदुरबारमध्ये 'झुलेलाल' नामाचा जयघोष

# संत बाबा ठाकूर घनश्याम दास साहेब यांचा वार्षिक मेला महोत्सव भक्तीमय वातावरणात संपन्न!


**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहरातील सिंधी कॉलनी परिसरातील प्रसिद्ध 'दुख भंजन दरबार' येथे परमपूज्य संत बाबा १०८ ठाकूर घनश्याम दास साहेब यांचा वार्षिक मेला महोत्सव ५ मार्च ते ७ मार्च दरम्यान अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. तीन दिवस चाललेल्या या सोहळ्यात संपूर्ण नंदुरबार शहर भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले होते.या महोत्सवाची सुरुवात ५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता श्री पूज्य पाठ साहेब यांच्या आरंभाने झाली. यावेळी भावनगरहून आलेले परम पूजनीय संत तुळशीदास जी महाराज यांनी आपल्या अमृतवाणीतून सत्संग व प्रवचन सादर केले. त्यांच्या रसाळ वाणीतून



वाहणाऱ्या ज्ञानगंगेने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.महोत्सवाचा दुसरा दिवस (६ मार्च) विशेष आकर्षण ठरला. छमाँ छम झुलेलाल भजन मंडळ, नंदुरबार तर्फे पूज्य झुलेलाल बाबांच्या 'महा बेहराणा साहेब' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भजनांच्या सुरांवर आणि 'जय झुलेलाल'च्या जयघोषात अबालवृद्धांनी ठेका धरला. नाचत-गाजत भाविकांनी या भक्तीसोहळ्याचा आनंद लुटला.७ मार्च रोजी महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी सकाळी ११ वाजता पूज्य पाठ साहेबांना 'भोग साहेब' अर्पण करण्यात आला. त्यानंतर आयोजित भव्य 'आम भंडारा' (महाप्रसाद) मध्ये हजारो भाविकांनी शिस्तीत महाप्रसादाचा लाभ घेतला. या महाप्रसादाने महोत्सवाची यशस्वी सांगता झाली.संतांची शिकवण आणि भक्तीचा मार्गच मानवाला सुख-शांती देऊ शकतो, अशी भावना याप्रसंगी भाविकांनी व्यक्त केली.या भव्य मेला महोत्सवाचे नेटके नियोजन परम पूज्य संत बाबा ठाकूर घनश्यामदास सेवा मंडळ आणि ठाकूर परिवारा तर्फे करण्यात आले होते. महोत्सवासाठी सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले, ज्यामुळे हा सोहळा न भूतो न भविष्यती असा पार पडला.

# रोटरी क्लबतर्फे गेवराई येथे ८ मार्चला मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन



**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

समाजामध्ये आरोग्यपूर्ण वातावरण निर्माण व्हावे.मुलांमध्ये खिलाडूवृत्ती जोपासली जावी, मुले शारीरिक दृष्ट्या निरोगी राहावीत यासाठी रोटरी क्लबने एक पाऊल उचलत ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून मॅरॅथॉन क्रीडा स्पर्धा आयोजित केली आहे . नेहमी कार्यरत आणि सकारात्मक कामगिरी करणाऱ्या रोटरी क्लब ,लातूर पॅटर्न क्लासेस आणि पाथ फाईंडर करियर अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनी ८ मार्च रोजी सकाळी ६ वाजता विविध अंतराच्या तालुका स्तरीय मॅरॅथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे. आठवी ते दहावी मुलांसाठी ३ किमी,मुलींसाठी २ किमी,खुल्या गटात मुलांसाठी ५ किमी आणि मुलींसाठी ३ किमी अंतर ठेवण्यात आले आहे. स्पर्धा गेवराई येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून सुरू होईल आणि अंतर कापून आल्यावर शिवाजी महाराज चौकात पूर्ण होईल. स्पर्धेसाठी कसलेही शुल्क नाही. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी १५ मिनिटपूर्वी खेळाडूंनी उपस्थित राहावे.आठवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना आपले ओळखपत्र अथवा शाळेचे पत्र द्यावे लागेल. धावण्याची व शारीरिक क्षमता पाहूनच मोठ्या संख्येने स्पर्धेत सहभागी व्हावे,असे आवाहन रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र बरकसे, उपाध्यक्ष सुदाम धुपे,सचिव प्रविण जैन ,प्रोजेक्ट चेयरमैन डॉ.नागनाथ मोटे, उमेश बजाज,सुनील घाटूळ ,पाथ फाईंडर करियर अकादमीचे संचालक पवन राऊत आणि लातूर पॅटर्न क्लासेसचे संचालक प्रल्हाद खेत्रे यांनी केले आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त रयत सामाजिक प्रतिष्ठानकडून महिलांचा सन्मान



**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने महिलांचा सन्मान करण्याचा स्तुत्य उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत ७ मार्च रोजी रात्री १२ वाजल्यापासून ८ मार्च या महिला दिनाच्या दिवशी ज्या मातांना कन्यारत्न प्राप्त होईल, अशा महिलांचा साडी-चोळी देऊन विशेष सन्मान करण्यात येणार आहे.यासोबतच शहरातील गरजवंत महिलांचाही साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या सल्लागार संगीताताई धसे यांनी प्रसारमाध्यमांना दिली.या कार्यक्रमाचे आयोजन रोहिणीताई गणेश माने यांच्या पुढाकाराने होत असून, प्रतिष्ठानच्या अध्यक्ष सुलोचना माने, शुभांगी माने यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्या उपस्थित राहणार आहेत.महिला सशक्तीकरणाचा संदेश देत समाजात मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे आणि महिलांना सन्मान मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# तारीख पे तारीखचा फास: नंदुरबारच्या ग्रामीण विकासाला 'ब्रेक'; निवडणुकांच्या अनिश्चिततेने राजकीय मरगळ

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारणाचा कणा मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका दीर्घकाळापासून प्रलंबित राहिल्या आहेत. विशेषतः नंदुरबारसारख्या आदिवासीबहुल आणि दुर्गम भागात, जिथे विकासाच्या योजनांची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून होते, तिथे निवडणुकांच्या वारंवार टळणाऱ्या तारखांमुळे 'लोकशाही प्रक्रिया' कोलमडली आहे.

**नंदुरबारच्या निवडणुका का आहेत महत्त्वाच्या?**

नंदुरबार हा जिल्हा पूर्णपणे ग्रामीण आणि दुर्गम भागांवर आधारित आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, आणि अंगणवाडीसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत थेट काम केले जाते. मात्र, गेल्या




अनेक महिन्यांपासून लोकप्रतिनिधींच्या अभावामुळे येथे प्रशासकीय राजवट सुरू आहे.

जिल्हा परिषदेचे धोरणात्मक निर्णय घेणारे लोकप्रतिनिधी नसल्यामुळे अनेक ग्रामीण विकास कामे धोरणात्मक पातळीवर अडकून पडली आहेत. प्रशासकीय अधिकारी केवळ दैनंदिन कामकाज करत असून, दीर्घकालीन प्रकल्पांकडे दुर्लक्ष होत आहे.

निवडणुकांच्या तयारीत असलेल्या नंदुरबारमधील अनेक इच्छुकांनी प्रचाराची पूर्वतयारी म्हणून मोठी गुंतवणूक केली आहे. निवडणुका वारंवार पुढे ढकलल्या गेल्याने ही गुंतवणूक निष्फळ ठरून उमेदवारांमध्ये तीव्र नैराश्य पसरले आहे.स्थानिक नेते आणि मतदार यांच्यातील दुवा असलेला 'निवडणूक' हा घटक गायब झाल्याने, गावपातळीवरील समस्या मांडण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध नाही.जून महिन्यात या संदर्भात कोर्टाचा निर्णय होणार आहे , जून महिन्यात पावसाळ्याचे आगमन आणि त्यानंतरची प्रशासकीय अडचण यामुळे निवडणुका आणखी लांबणीवर जाण्याची शक्यता आहे. नंदुरबारसारख्या दुर्गम भागात पावसाळ्यात दळणवळणाची साधने मर्यादित असतात, अशा वेळी निवडणुका घेतल्यास मतदानाची टक्केवारी कमी होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.निवडणुका लांबल्यामुळे ग्रामीण भागातील 'लोकशाही उत्तरदायित्व' धोक्यात आले आहे. नंदुरबारच्या राजकारणात सध्या असलेली 'उदासीनता' ही भविष्यातील निवडणुकांसाठी एक मोठे आव्हान ठरणार आहे. जेव्हा निवडणुका जाहीर होतील, तेव्हा या मरगळीतून बाहेर पडण्यासाठी राजकीय पक्षांना आणि उमेदवारांना पुन्हा शून्यातून सुरुवात करावी लागणार आहे.

# बरंजळा लोखंडे येथील शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या ५५ भूमिपुत्रांचा गौरव

**दैनिक वादळ वार्ता**
**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील बरंजळा लोखंडे येथे बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष नारायण लोखंडे यांच्या वतीने विविध क्षेत्रात कार्यकर्तृत्व गाजवण्याऱ्या व्यक्तींचा सन्मान आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा यशवंत गोसावी तसेच प्रमुख पाहुणे म्हणून क्रांतिकारी शेतकरी संघटना अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री रविकांत तुपकर तसेच सरपंच मंगेश साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बळीराजा फाऊंडेशन चे अध्यक्ष नारायण लोखंडे,विकास जाधव,कृष्णा इंगळे,अजिनाथ वानखेडे, नारायण साबळे यांची उपस्थिती होती.

बळीराजा फाऊंडेशन आयोजित गौरव कर्तृत्वाचा कार्यक्रम यशस्वी पार पडला. २०१० नंतर शासनाच्या विविध पदावर कार्यरत असलेल्या ५५ भूमिपुत्रांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र भेट देऊन गौरव करण्यात आला. यावेळी रविकांत तुपकर यांनी बोलतांनी सांगितले की वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या यशस्वी लोकांमागे आई वडिलांचें मोठे योगदान असते. कुटुंबं सक्षम झालं की गाव सक्षम व्हायला वेळ लागत नाही.अनेक तरुण दुर्गम परिस्थितीवर मात करून शिक्षण घेत आहेत. तरुण कठोर परिश्रमाने स्पर्धा परीक्षेत यश मिळवून शासकीय सेवांमध्ये योगदान देत आहेत.गावातील तरुणांचा सैन्याकडे असलेला ओढा लक्षणीय आहे. बळीराजा फाऊंडेशन आयोजित उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या भूमिपुत्रांचा गौरव कर्तृत्वाचा कार्यक्रम प्रेरणादायी असल्याचे रविकांत तुपकरांनी सांगितले.त्यानंतर यावेळी शिवचरित्रकार प्रा. यशवंत गोसावी यांनी बोलतांनी सांगितले की,गावातील विविध क्षेत्रात आजच्या बदलत्या काळात एखाद्या गावाची ओळख फक्त रस्ते,इमारती किंवा विकासकामांवरून होत नाही,तर त्या गावातील लोकांच्या विचारांवरून ठरते.ज्या गावात सकारात्मक विचार परस्पर सहकार्य आणि समाजहिताची भावना असते,ते गाव खऱ्या अर्थाने समृद्ध मानले जाते. असेच एक गाव म्हणजे बरंजळा लोखंडे या गावातील नागरिक शिक्षण,संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांना प्राधान्य देत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077